श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी

जा. नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/३६५/२०२४

दिनांक [illegible]

**विषय :- व्यवसायरोध भत्ता (एन.पी.ए.) बाबत...**

वाचा :-
१) जा. नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/२१९/२०१० दि.०३ नोव्हेंबर, २०१० रोजीचा आदेश.
२) जा. नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/१५९९/२०१३ दि.२८ मार्च, २०१३ रोजीचा आदेश.
३) वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्रमांक वेपुर२०१९/प्र.क्र.१/सेवा-९ दि.३० जानेवारी, २०१९ रोजीचा शासन निर्णय.
४) मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०४ जुलै, २०१९ चे सभेतील निर्णय क्र. ३७१
५) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य यांचा शासन निर्णय क्रमांक मवैअ-२०२२/प्र.क्र.२०६/सेवा-३ दि. १४ ऑक्टोबर, २०२४.

## आदेश.

संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय विभागाकडे वेतनश्रेणीवर नेमणूकीवर असलेले वैद्यकीय अधिकारी / आरएमओ / सीएमओ यांना वाचा क्र.०२ चे आदेशानुसार ६ व्या वेतन आयोगातील मुळ वेतनाच्या (मुळवेतन- ग्रेड पे) ३५% व्यवसायरोध भत्ता (एन. पी. ए.) लागू करणेत येऊन अदा करणेत येत आहे.

वाचा क्र.३ नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, २०१९ संबंधित वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्रमांक वेपुर२०१९/प्र.क्र.१/सेवा-९ दि.३० जानेवारी,२०१९ नुसार ७ वा वेतन आयोग त्यातील तरतुदींसह व इतर अनुषंगिक बाबींसह दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासुन पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणेस वाचा क्र.४ चे मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०४ जुलै, २०१९ चे सभेतील निर्णय क्र. ३७१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर तरतुदीनुसार संस्थान आस्थापनेवरील स्थायी (कायम) अधिकारी / कर्मचारी यांना वेळोवेळी लागू होणा-या वाढी त्यांचे वेतनात प्रशासकीय मान्यतेने लागू करण्यात येत असतात.

आता, वाचा क्र.५ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.१४.१०.२०२४ रोजीचे शासन निर्णयान्वये गट – अ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी गट अ (एस-२०) व त्यापेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणीतील अधिका-यांना तसेच दंतशल्यचिकीत्सक (एस-२०) व दंतशल्यचिकीत्सक विशेषज्ञ संवर्ग (एस-२३) यांना ७ व्या वेतन आयोगातील वेतन श्रेणीनुसार व्यवसाय रोध भत्ता लागू करणेबाबत निर्णय झालेला आहे. सदर निर्णयास अनुसरुन श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय विभागांमध्ये स्थायी (कायम) पदावर कार्यरत वैद्यकीय अधिकारी / आरएमओ/ सीएमओ यांना ७ व्या वेतन आयोगातील वेतन श्रेणीनुसार त्यांचे सध्याचे मुळ वेतनावर ३५% व्यवसायरोध भत्ता (एन.पी.ए.) माहे ऑक्टोबर, २०२४ च्या वेतनापासुन रोखीने नियमीतपणे अदा करणेबाबत खालील अटी-शर्तीवर मंजूर करणेत येत आहे.

१. ज्या पदांना व्यवसाय रोध भत्ता अनुज्ञेय करण्यात आलेला आहे, त्या पदावरील वैद्यकीय अधिका-यांना कोणत्याही प्रकारे खाजगी, स्वतंत्र व्यवसाय करता येणार नाही व तसे आढळल्यास ते नियमानुसार कारवाईस पात्र राहतील. तथापि, सदर तरतुदींची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्याची खालील कार्यपद्धती / यंत्रणा विहित करण्यात येत आहे :-

पान नं. ०२ वर

१.१) व्यवसायरोध भत्ता लागू केला असल्यामुळे कोणत्याही वैद्यकीय अधिका-याला याबाबत व्यवसाय रोध भत्ता न घेण्याबाबतचा विकल्प देता येणार नाही.

१.२) व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असलेल्या वैद्यकीय अधिका-यांनी रुग्णालयाचे आवश्यकतेनुसार व तातडीचे वेळी रुग्णालयात उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

१.३) व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असलेल्या वैद्यकीय अधिका-यांना स्वतःच्या नावे रुग्णालय, दवाखाना चालविता येणार नाहीत किंवा नोंदणी करता येणार नाही.

१.४) व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय वैद्यकीय अधिकारी अन्य खाजगी रुग्णालयात किंवा दवाखान्यात जावून आरोग्य सेवा देत नाही याबाबतचे दरवर्षी एप्रिल मध्ये रु.१००/- चे स्टॅम्पपेपरवर हमीपत्र देणे बंधनकारक राहील. तसेच, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील स्थायी (कायम) पदावरील सर्व वैद्यकीय अधिकारी यांना व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय केला असल्याने खाजगी व्यवसायास पूर्णतः बंदी राहील याबाबत संस्थानकडून आकस्मिक भेटीद्वारे यासंबंधी चौकशी केली जाईल व त्यावेळी वैद्यकीय अधिकारी खाजगी व्यवसाय करीत असल्याचे आढळून आल्यास संबंधित वैद्यकीय अधिकारी जबर शिक्षेस पात्र राहील.

१.५) व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असलेल्या वैद्यकीय अधिका-यांची कोणत्याही रुग्णालयात / दवाखान्यात कोणत्याही प्रकारची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष भागीदारी असता कामा नये.

१.६) व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असलेल्या वैद्यकीय अधिकारी खाजगी व्यवसाय करीत नाहीत तसेच तातडीच्या वेळी उपलब्ध राहतात किंवा कसे? हे श्री साईबाबा हॉस्पीटलकडील वैद्यकीय संचालक व श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकीय अधिक्षक यांनी दरमहा प्रमाणित करणे बंधनकारक राहील व तसा अहवाल मा. मुख्य कार्यकरी अधिकारी यांचेकडे सादर करतील.

१.७) श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील ज्या वैद्यकीय अधिका-यांना व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असेल त्यांचेविरुध्द श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपील) विनीयम, २०१३ प्रकरण ३ विनीयम ५ नुसार शिस्तभंगविषयक विभागीय चौकशी अंती अपराध दोष सिद्ध झाल्यानंतर ज्या दोषी वैद्यकीय अधिका-यांवर शिक्षेचे आदेश बजावले जातील त्या अपराध / दोषारोप सिद्ध झालेल्या वैद्यकीय अधिका-यांना शिक्षा कालावधी दरम्यान व्यवसाय रोध भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

१.८) श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयांचे दर्शनी भागात "येथे काम करणा-या वैद्यकीय अधिका-यांना व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असल्याने खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे" असा फलक रुग्णालयात लावण्यात यावा.

१.९) वैद्यकीय अधिका-यांना व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असल्याची व त्यांना खाजगी व्यवसाय करण्यास प्रतिबंध असल्याची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी.

१.१०) वैद्यकीय अधिका-याने आयकर विभागास सादर केलेल्या आयकर विषयक विवरणपत्राची (Income Tax Return) प्रत माहितीसाठी वैद्यकीय संचालक / वैद्यकीय अधिक्षक यांचेकडे सादर करावी.

पान नं.०३ वर

२.११) ज्या वैद्यकीय अधिका-यांना उच्च शिक्षणासाठी प्रशिक्षणावर पाठविण्यात येईल अशा वैद्यकीय अधिका-यांना प्रशिक्षण कालावधी दरम्यान व्यवसाय रोध भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील स्थायी (कायम) पदावरील वैद्यकीय अधिकारी यांना ७ व्या वेतन आयोगातील वेतन श्रेणीनुसार त्यांचे सध्याचे मुळ वेतनावर ३५% व्यवसायरोध भत्ता (एन.पी.ए.) माहे ऑक्टोबर, २०२४ च्या वेतनापासुन नियमीतपणे लागू करावा.

वैद्यकीय संचालक / वैद्यकीय अधिक्षक यांनी स्थायी (कायम) पदावरील सर्व वैद्यकीय अधिकारी यांना सदर आदेशाची समज देऊन समज मिळालेबाबत स्वाक्षरीची मुळ प्रत इकडील कार्यालयाकडे सादर करावी व दुसरी प्रत संबंधित रुग्णालयाचे दप्तरी ठेवावी.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

प्रत –
१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक
२. मुख्य लेखाधिकारी यांचे स्वीय सहाय्यक
३. वैद्यकीय संचालक
४. प्र. वैद्यकीय अधिक्षिका
५. वित्त विभाग, रुग्णालये
६. पगार बिल विभाग, रुग्णालये
७. सामान्य प्रशासन विभाग
८. स्थळप्रत.